# भव्य अखंड हरिनाम सप्ताहाच्या सातव्या दिवसाचे यजमानपद लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे.




श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल कॉलेजेस आयोजित भव्य अखंड हरिनाम सप्ताह 2023 चा विद्यमाने आज ११/०३/२०२३ रोजी ७ व्या दिवसाच्या महापूजेचा मान लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला मिळाला. त्या अनुषंगाने सकाळी ०९:२० मिनिटांनी श्रीराम मंदिरामध्ये लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे माननीय प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांच्या हस्ते विधिवत महापूजा करण्यात आली, तसेच ह.भ. प. श्री प्रकाश महाराज साठे यांच्या किर्तनाने लोकमंगल कॉलेजचा परिसर भक्तिमय वातावरणाने आणि चैतन्याने न्हाहून निघाला. दुपारी ०२:०० वाजता कीर्तन समाप्ती झाल्यानंतर ह भ प श्री प्रकाश महाराज साठे यांचा लोकमंगल आयटीआयचे निदेशक श्री संभाजी जाधव सर व श्री राहुल गवळी सर यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दुपारी ०२:०० नंतर लोकमंगल समूहाचे संस्थापक माननीय श्री सुभाष (बापू) देशमुख यांचे कार्यक्रम स्थळी आगमन झाले. त्यांच्यासोबत सुप्रसिद्ध प्रवचनकार माननीय श्री गणेश शिंदे सर आणि प्रसिद्ध गायिका सन्मिता धापटे शिंदे यांचे कार्यक्रम स्थळी आगमन झाले. दुपारी ०३:०० वाजता संपन्न झालेल्या सत्कार समारंभामध्ये भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे प्रक्षेपण करणाऱ्या झी टॉकीज वृत्तवाहिनीच्या सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला, माननीय श्री गणेश शिंदे सर यांचा सत्कार माननीय श्री सुभाष बापू देशमुख यांच्या हस्ते शाल श्रीफळ व विठ्ठल रुक्मिणी ची मूर्ती देऊन करण्यात आला. सुप्रसिद्ध गायिका मा.सन्मिता धापटे शिंदे मॅडम यांचा सत्कार माननीय स्मितातार्ई देशमुख यांच्या शुभ हस्ते करण्यात आला.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या सातव्या दिवसाच्या कार्यक्रमाचे व्यवस्थापकीय नियोजन व यजमानपद लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य माननीय श्री योगेश गायकवाड सर यांनी पाहिले. तसेच आयटीआय मधील सर्व निदेशकानी व्यवस्थापकीय नियोजन संभाळले तसेच विजतंत्री प्रथम वर्ष च्या विद्यार्थ्यांनी विजतंत्री निदेशक माननीय संध्याराणी शिंदे मॅडम यांच्या नेतृत्वाखाली इलेक्ट्रिकल वायरिंग, साऊंड, जनरेटर, इत्यादी टेक्निकल बाबी हाताळल्या.